IMPACT FACTOR 5.473(SJIF)
UPA NATIONAL E-JOURNAL
Interdisciplinary Peer-Reviewed Indexed Journal
ISSN 2455-4375

# ग्रंथालये : काल, आज आणि उद्या

**डॉ. रंजना भानुदास व्यवहारे**
विमेन्स कॉलेज आर्टस ॲन्ड कॉमर्स
३१० – बी, न्यु नंदनवन, नागपूर
Email – taywadev@gmail.com

---

***सारांश** :*

*ग्रंथालये म्हणजे ग्रंथसंग्रहाचे स्थान, ठिकाण होय. प्रचीन काळापासूनच ग्रंथालये ही ज्ञानाची भंडारे असल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे ज्ञानाच्या संवर्धनाचे काम सुद्धा ग्रंथालये करीत आहेत. एका पिढीकडून दुस—या पिढीकडे ज्ञान संवर्धन करण्याचे महत्वाचे काम ग्रंथालये करीत आहेत. तसेच प्राचीन काळापासूनच ग्रंथालये ही एक सामाजिक संस्था असून तिला एक इतिहास आहे. ग्रंथ, वाचक आणि ग्रंथालयीन सेवक या तीन घटकांनी ग्रंथालय ही संकल्पना पूर्ण होते. या घटकामध्ये काळानुरूप बदल होतांना दिसून येतो. त्याचप्रमाणे ग्रंथालयाचे प्रकार आणि त्याचे कार्य याचांही विचार महत्वाचा ठरतो. काळानंरूप ग्रंथालयाच्या स्वरूपात बदल होतांना दिसून येतो. ग्रंथालयाच्या बदलाच्या अवस्थेंचा अभ्यास करतांना प्राचीन, आधुनिक आणि उद्याच्या म्हणजेच भविष्यातील ग्रंथालयाचा विचार करणे महत्वाचे ठरते.*

---

## ग्रंथालयाचा इतिहास :

ग्रंथालय म्हणजे सर्व प्रकारच्या छापील आणि हस्तलिखित माहिती साठवण्याचे एक महत्वाचे ठिकाण होय. ग्रंथालयाचा इतिहास हा मानवाच्या लेखनासोबतचा आहे. जेव्हा लेखनाची सुरूवात झाली तेव्हा ज्ञानाची नोंद ठेवण्याचे आणि त्यांचे जतन करण्याचे महत्वाचे काम करण्यासाठी ही केंद्र तयार झाल्याचे दिसून येते. प्राचीन काळात नालंदा विश्वविद्यालयाचे समृद्ध ग्रंथालय होते. मध्ययुगीन काळातही हस्तलिखिते, पोथ्या जतन करून ठेवल्या जात असे. तसेच राजा—महाराजे यांचे स्वतंत्र ग्रंथसंग्रह असत. आधीच्या काळात ग्रंथालयाचा इतिहास बघता ही ग्रंथालये केवळ पुस्तके ठेवण्याचे इिकाण नसून ते एक ज्ञानाचे केंद्र आणि संस्कृतीचे प्रतीक होते. एका पिढीकडून दुस—या पिढीकडे ज्ञान स्थलांतर करण्याचे महत्वाचे काम ही केंद्र करीत आहेत.

कागदपत्राच्या संग्रहाचे आयोजन करण्याच्या पहिल्या प्रयत्नापासून सुरू झालेला हा प्रवास आहे. संग्रंहाची उपलब्धता, साहित्याचे व्यवस्थापन आणि साधने शोधने, पुस्तक व्यापार यांचा समावेश ग्रंथालय संदर्भात होतो. ग्रंथालये ही सुरूवातीच्या काळात अभिलेखागार आणि वस्तुसंग्रहालये या स्वरूपात होती. त्यामध्ये उपलब्ध असलेल वाचन साहित्य ग्रंथ, भूजपत्रे, चर्मपत्रे या स्वरूपात होते. नंतर कागद व छपाईचा शोध लागल्यानंतर छापील ग्रंथ व इतर वाचन साहित्याच्या साहाय्याने ग्रंथालये विकसीत होऊ लागली.

## ग्रंथालयाचा विकास :

भारतात प्राचीन काळापासून ग्रंथालयाचे स्वरूप अस्तित्वात आहेत. पण ती ग्रंथालये धार्मिक स्थळामध्ये स्थापन झाल्याचे दिसून येते. कारण त्या काळी शिक्षण घेण्याची ठिकाणे बुद्धविहारे, मंदिरे, होती. शिक्षण घेतांना काही आवश्यकता असल्यास यामधील ग्रंथ्संग्रहाचा आधार घेतला जात होता. प्राचीन भारतात नालंदा, तक्षशिला, विक्रमशिला, राजगृह, वल्लभी इ. विद्यापीठे अस्तित्वात होती. आणि त्या विद्यापीठामधूनच शिक्षण होत होते. त्यानंतर भारतात ब्रिटिशांच्या आगमनानंतर विद्यापीठे आणि महाविद्यालये स्थापन करण्यात आली. स्वातंत्र्यानंतर विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा विकास आणि

संशोधनाकरीता संशोधनपर प्रयोग शाळा स्थापन करण्यात आल्या. याप्रमाणेच भारतात धार्मिक ग्रंथालयापासून सुरू झालेला हा प्रवास पारंपारी ग्रंथालय ते सध्याच्या तंत्रज्ञानयुक्त ते उद्याच्या व्हर्च्युअल ग्रंथालयापर्यंत येऊन पांहचलेला आहे.

### कालची ग्रंथालये (प्राचीन ग्रंथालय) :

भारतात अनेक प्राचीन ग्रंथालय असन्याचे दिसून त्यात नालंदा आणि तक्षशिला ही महत्वाची असल्याचे दिसून येते. नालंदा हे एक बौद्ध विद्यापीठ हाते आणि त्याचे ग्रंथालय धर्मगंज म्हणून ओळखले जात असे. नालंदा आणि तक्षशिला ही ग्रंथालये शिक्षण संस्थाचा भाग होते. तेथे विद्यार्थी आणि शिक्षक एकत्रितपणे अभ्यास आणि संशोधन करीत असे. प्राचीन ग्रंथालयात शिला, चर्म, अथवा तत्सम साधनाद्वारे तयार केलेले ग्रंथ तसेच दृष्टिका, पपायरस व चामडे यावर लिहिलेले ग्रंथ असत ही सर्व ग्रंथ दुर्मिळ असल्यामुळे त्यांचे रक्षण करणे एवढेच कार्य करावे लागत असे. प्राचीन ग्रंथालयात कोणत्याही सामान्य लोकांना प्रवेश मिळत नव्हता. तर विशिष्ट लोकांसाठीच जसे राजे महाराजे, धर्मगुरू, तत्वज्ञ, राजघराण्यातील लोक यांच्यासाठीच ते खूले होते. ग्रंथालयात हस्तलिखिते, मातीच्या विटा आणि पॅपिरस याच्या स्वरूपात ही ग्रंथसग्रह असायचा. ज्ञानाचे जतन करणे आणि विशिष्ट लोकांना उपलब्ध करून देणे हाच मुख्य उद्देश होता. ग्रंथसंग्रह हा अत्संत नाजुक आणि दुर्मिळ स्वरूपात असल्याने त्याची काळजी घेणे खूप कठीण जात होते. त्यामुळेच ही ग्रंथ एकाच ठिकाणी बसून वाचावे लागत होते. प्राचीन ग्रंथालयांना राजकीय आणि धार्मिक महत्व होते. राजामहाराजा आपली सत्ता आणि बुद्धिमत्ता दर्शविण्यासाठी भव्य स्वरूपाचे ग्रंथालये उभारून त्यांचा वापर करत असे. प्रचीन ग्रंथालयामध्ये विशिष्ट विषयावरच पुस्तके जास्त प्रमाणात राहायचे. जसे. धर्मावर आधरीत, तत्वज्ञान, ज्योतष, आणि साहित्य इ.

थोडक्यात प्राचीन ग्रंथालये ही ज्ञानाची केंद्र असून त्याचा वापर हा धराणेशाही साठीच असून त्यात प्रवेशही मर्यादीत स्वरूपाचा होता.

### पारंपारीक ग्रंथालये :

पारंपारीक ग्रंथालये म्हणजे जिथे पुस्तके आणि नियतकालिके, हस्तलिखिते यांचा मुद्रित स्वरूपात संग्रह केलेला असतो. पारंपारीक ग्रंथालयामध्ये ज्ञानाचा साठा, संग्रह कागदी व छापील स्वरूपात असतो. जसे की पुस्तके, मासिके, वृत्तपत्रे, नकाशे, दुर्मिळ पुस्तके इत्यादीचे जतन करून वाचकांना त्यांच्या वाचन सुविध पुरविल्या जातात. पारंपारीक ग्रंथालयात सगळयाच वाचनीय साहित्याचा साठा एका ठिकाणी करून त्याचे जतन करणे आणि वाचकांना त्यांच्या आवडीचे वाचनीय साहित्य पुरविणे हा महत्वाचा उद्देश होता. वाचकांना त्यांच्या आवडीचे पुस्तकाचे वाचन करण्यासाठी ग्रंथालयात यावे लागत किंवा पुस्तक घरी नेण्यासाठी त्या पुस्तकाची नोंदी करावी लागत असे. पारंपारीक ग्रंथालयात बसून अभ्यास करण्यासाठी अनुकल असे वातावरण असते. या ग्रंथालयात शांततेला महत्व दिल्या जाते.

### परंपारी ग्रंथालयाचे वैशिष्टे :

परंपारीक ग्रंथालयाचे अनक महत्वपूर्ण वैश्सिष्टये सांगू शकतो.

- माहितीचा संग्रंह
- भौतिक स्वरूप
- वाचन सुविधा
- शैक्षणिक कार्यक्रम
- ग्रंथ्संग्रह

अशाप्रकारे पारंपारीक ग्रंथालयाचे वैशिष्टे आहेत.

### आजची ग्रंथालये (आधुनिक ग्रंथालय) :

आधुनिक ग्रंथालय बद्दल विचार करता आधुनिक ग्रंथालय ही पारंपारीक ग्रंथालयापेक्षा खूप वेगळे आहेत. आधुनिक ग्रंथालय ही छापील पुस्तके आणि मासिके साठवणारे एक ठिकाण नसून ही गंथालये ज्ञान आणि माहितीच्या संकलनातून पुढे जाऊन माहितीची देवाण घेवाण करणारी संस्था बनली आहे. जिथे आता पुस्तकासोबतच डिजिटल माहितीचाही समावेश आहे. म्हणजेच पारंपारीक ग्रंथालयाच्या तुलनेत ही अधिक तंत्रज्ञानयुक्त व उपयोकर्त्यासाठी फारच सोयीचे झाल्याचे दिसून येते. आधुनिक ग्रंथालय ही पारंपारक आणि आधुनिक यांच्या मिश्रणातून निर्माण झाली आहे. म्हणजे हायब्रीड स्वरूपाचे असल्याचे दिसून येते. महणजेच ग्रंथालयात छापील पुस्तके, मासिके, जर्नल्स, वत्तपत्रे ही तर आहेतच पण त्याचबरोबर डिजिटल स्वरूपातील माहिती पण सहजपणे मिळते. ई–पुस्तके, ई–जर्नल्सृ, ई.–डेटाबेसेस, नियतकालिके, ऑडिओबुक, आणि इतरही डिजिटल संसाधनाचा मोठा संग्रह असतो.यामुळे आधुनिक ग्रंथालयात दोन्हीचा सगंम झाल्याचे दिसून येते. ग्रंथालयात तंत्रज्ञानाचा वापर मोठया प्रमाणावर होत असल्याने ग्रंथालयातून पुस्तकांच्या नोदी करणे, देवाण घेवाण, आणि व्यवस्थापन करणे सोपे झाले आहे. त्याचबरोबर ग्रंथालयातील दैनंदिन जी कामे होती ती सुद्धा तंत्रज्ञानाच्या साहाय्याने करतांना सोईचे झाले आहे. त्यामुळे ग्रंथालयातील कर्मचा–याचा वेळ वाचला जाऊ शकतो.

आधुनिक ग्रंथालयातून तंत्रज्ञानाचा वापर मोठया प्रमाणावर होतांना दिसत आहे यामुळे आता ग्रंथपालाची भूमिका सुद्धा बदललेली असल्याचे दिसून येते. ग्रंथपाल आता फक्त पुस्तकांची देवाण घेचाण करीत नसून तो वापरकर्त्यांना डिजिटल संसाधने आणि माहिती शोधण्यास मदत करतात. तसेच त्यांना लागणा–या माहितीशी मिळती– जुळती नविन काही माहिती मिळत असेल तर त्याचीही माहिती आपल्या वापरकर्त्यास पुरविण्याचे काम ग्रंथपाल करीत असतो. त्याचप्रमाणे ग्रंथालयातून सेवा देतांना वेगवेगळया प्रकारच्या सेवा दिल्या जातात. यात प्रथम संदर्भ सेवेचा विचार करू संशोधन करीत असतांना वाचकांना काही वेळेस वेगवेगळे प्रश्न असतात त्या प्रश्नाची उत्तरे शोधण्यास मदत करावी लागते. त्साचप्रमाणे वाचकांना काही वेळेस प्रत्यक्ष ग्रंथालयात कोणतीही माहिती मिळत नाही तेव्हा त्यांना डिजिटल साधने वारून अचूक अशी माहिती कशी मिळवायची याचेही शिक्षण दयावे लागते. त्याचप्रमाणे वाचक आपल्या ग्रंथालयाकडे जास्तीत जास्त आकर्षित होण्यासाठी आणि वाचन संसकृतीला प्रोत्साहन देण्यासाठी ग्रंथालयात पुस्तक प्रदर्शनी, कार्यशाळा आणि एखादय पुस्तकावर चर्चा अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन करावे जेणे करून विद्यार्थी ग्रंथालयाशी जुळून राहील.

### ग्रंथालये व्यवस्थापनातील नवीन प्रवाह :

ग्रंथालय व्यवस्थापनात नवनवीन घटकांचा मोठया प्रमाणात उदय होत आहे. नव्या दिशेने प्रगती साधायची असेल तर व्यवस्थापकीय क्षेत्रात नाविण्य आणने फार महत्त्वाचे असते. व्यवस्थापनातील विविध बदलांचा ग्रंथालयाच्या सेवा देण्यावर फार परिणाम होतो. व्यवस्थापनातील बदल वाचकाच्या ग्रंथालयाविषयीच्या अपेक्षा, नवीन तंत्रज्ञान , संशोधन अशा महत्त्वाच्या गोष्टी ग्रंथालयाच्या आधुनिकीकरणावर परिणाम करून जातात. व्यवस्थापनातील आधुनिकता किंवा नवे प्रवाह ग्रंथालय व्यवस्थापनाकरिता फार मोलाचे असतात. या नवप्रवाहामुळे ग्रंथालयातील सेवेत नाविन्यता आणता येते. ग्रंथालयातील सेवेतील नाविन्यता वाचकांना ग्रंथालयाकडे आकर्षित करते. आजच्या स्पर्धेच्या युगात टिकुन राहायचे असेल तर प्रत्येक गोष्टीत नाविन्यता आणणे गरजेचे राहते उपभोकत्यांना पाहिजे असलेली माहिती किंवा डाटा उपलब्ध करून देणे, त्यांच्या समस्येचे निराकरण करणे त्यासोबतच त्यांचा वेळ वाया जाता कामा नये या गोष्टीना प्राधान्य देणे महत्वाचे ठरते.

### ग्रंथालयाचे बदललेले स्वरूप :

पुर्वीच्या काळी ग्रंथालयाची जी संकल्पना होती ती आता पुर्णपणे बदललेली आहे. पुर्वी ग्रंथालयातील ग्रंथाचा साठा, येणारा वाचक वर्ग , माहीतीची येणारी मागणी ही फार थोडया प्रमाणात असायची परंतु आता ग्रंथालयाची संकल्पना ही फार व्यापक स्वरूपाची झालेली आहे. आज ग्रंथालयात असणारा ग्रंथाचा साठा, ग्रंथालयात येणारा वाचक वर्ग , त्यांच्या माहिती विषयक गरजा या मोठया असून नवीन तंत्रज्ञानावर जास्त भर देण्यात येत आहे ग्रंथालयात मोठया प्रमाणात

तंत्रज्ञानाचा वापर होताना दिसुन येतो. या नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून संशोधक आपल्या माहिती विषयक गरजा ग्रंथालयात येऊन पुर्ण करू शकतात. आजच्या विद्यार्थ्यांना नाविन्याचा ध्यास, काहीतरी नविन मिळवण्याची इच्छा सतत राहते.

### ग्रंथालयातील संपुर्ण बदल :

आजची ग्रंथालय ही आधुनिकीकरणाने युक्त असून ग्रंथालयातील वाचन साहित्य हे त्यांच्या उपयोगाकरीता असते. परंतु या छापील साहित्या व्यतिरिक्त ई—स्वरूपातील साहित्यही भरपुर प्रमाणात असल्याचे दिसून येते. यात ई—न्यूज पेपर , ई—जर्नल्स , ई—बुक , ई—रेफरेन्सेस , ई— नियतकालिके ऑडिओ — व्हिडिओ माहिती इ. वाचन साहित्याचे प्रकार विद्यार्थ्यांना हाताळता येतात आणि हे सगळ वाचन साहित्य त्यांना इंटरनेटच्या साहाय्याने मिळविता येते. ऑनलाइन स्वरूपातील वाचन साहित्यामूळे विद्यार्थ्यांना पाहिजे असलेली माहिती त्वरीत मिळत असून संशोधनास वाव मिळत असल्याचे दिसून येते.

### वाचनसाहित्याच्या स्वरूपात बदल :

आधीच्या ग्रंथालयातील वाचन साहित्यापेक्षा आधुनिक ग्रंथालयात वाचन साहित्याच्या स्वरूपात आमुलाग्र बदल झाल्याचे दिसुन येते. आताच्या ग्रंथालयात छापील ग्रंथालयासोबतच इलेक्ट्रानिक वाचन साहित्याचा वापर जास्त प्रमाणात होताना दिसून येतो . इलेक्ट्रॉनिक वाचन साहित्याचे वेगवेगळे प्रकार ग्रंथालयात दिसुन येतात . या इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील वाचन साहित्य वाचकांना पाहिजे तेव्हा क्षणात मिळू सकते . तसेच बहुतेक इलेक्ट्रॉनिक वाचन साहित्य हे इंटरनेटच्या माध्यामातून ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध करण्यात येत आहे. ऑनलाईन पद्धतीने माहीती मिळत असली तरी छापील पुस्तकांनाही तेवढीच मागणी असते . वाचकांना , संशोधकाना त्यांच्या कामासाठी लागणारी माहिती मिळणे महत्वाचे असते . मग ती छापील स्वरूपातील असो किंवा इंटरनेटच्या माध्यामातून ऑनलाईन.

### वाचकांच्या मागण्यातील बदल :

आजच्या युगात संशोधनाला जास्त महत्त्व आल्याचे दिसुन येते. रोजच्या रोज काहीतरी नविन शोध झाल्याचे आपणास दिसून येते. या संशोधकांना त्यांच्या संशोधनाकरिता लागणारी माहिती ही नविन माहिती पाहिजे असते. ही ताजी नवीन माहिती त्यांना नविन नियतकालिके, न्युज पेपर , तसेच इंटरनेटच्या माध्यामातुन ऑनलाइन पध्दतीने मिळविता येते. तसेच स्पर्धा परीक्षा देणा—या विद्यार्थ्यांना सुध्दा ताज्या घडामोडी विषयीची माहिती जास्त पाहिजे असते. या ताज्या घडामोडीकरिता ग्रंथालयात येणारे वेगवेगळे स्पर्धा परिक्षेचे मासिक इतर विषयाचे असलेले मासिक, लेटेस्ट जनरल नॉलेज तसेच ऑनलाईन माहिती इ. प्रकारातून त्यांना मिळविता येते . ग्रंथालयात येणारा विद्यार्थी हा दिवसेदिवस नविन माहितीची मागणी करणारा असतो . या करिताच ग्रंथालयात नविन व्यवस्थापकीय तत्वाचा अवलंब करून आधुनिकीकरण करणे गरजेचे झाले आहे. ग्रंथालयात येणा—या विद्यार्थांची मागणी ज्याप्रमाणात असेल. त्यानुसार ग्रंथालयाला माहितीचे व्यवस्थापन करावे लागते व त्यांच्या गरजा पुर्ण कराव्या लागतात.

अशाप्रकारे पारंपारीक ग्रंथालयापेक्ष आधुनिक ग्रंथालयाच्या स्वरूपात अमूलाग्र बदल झाल्याचे आपल्याला दिसून येते.

### उद्याची ग्रंथालये ( भविष्यातील ग्रंथालये) :

उद्याची म्हणजेच भविष्यातील ग्रंथालये ही पूर्णत: तंत्रज्ञानावर आधारीत म्हणजेच डिजिटल स्वरूपातील असण्याची शक्यता सांगू शकतो. कारण आधुनिक ग्रंथालयापासून तंत्रानाचा वापर वाढण्याचे दिसून येते. भविष्यकाळात म्हणजे उद्याचे ग्रंथालय हे तंत्रज्ञानाच्या पुढच्या वापराने युक्त असू शकतील. त्यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता, आभाससी वास्तक, आणि डिजिटल भंडार इ. सारख्या तंत्रानाचा उपयोग करून वाचकांना चांगल्या प्रकारे सेवा प्रदान करू शकतो. तसेच ही ग्रंथालय

कंवळ पुस्तक मिळविण्याऐवजी ज्ञान मिळविण्याचे, शिक्षण घेण्याचे आणि सुसवाद साधण्याचे एक महत्वाचे केंद्र बनू शकेल. कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग करून वाचकांना नाविन्यपूर्ण सेवा देण्यास मदत होईल. उद्याच्या ग्रंथालये तंत्रज्ञानावर जास्त भर देण्यात येऊ शकेल व ग्रंथालये ही डिजिटल ग्रंथालय म्हणून उदयास येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### तंत्रानयंक्त किंवा डिजिटल ग्रंथालयाची गरज :

भविष्यकाळातील ग्रंथालये पर्णत: तंत्रज्ञानयुंक्त किंवा डिजिटल स्वरूपात झाल्याचे पाहायला मिळू शकते. कारण ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या साहित्याचे जतन करणो, सुरक्ष करणे हे ग्रंथालयाचे अतिमहत्वाचे काम आहे. यादृष्टिने डिजिटल ग्रंथालय एक महत्वाचा पर्याय असल्याचे दिसून येते. डिजिटल ग्रंथालयाची निर्मिती ही भविष्याची गरज असेल असे म्हणता येईल.

भविष्यातील ग्रंथालये म्हणजे डिजिटल ग्रंथालये होण्याची काही कारणे पुडील प्रमाणे सांगता येतील.

**ग्रंथालयातील विविध साहित्याचे जतन करणे :.**

ग्रंथालयातील विविध प्रकारच्या साहित्याचा संगह असतो यात ग्रंथ, संदर्भ ग्रंथ, नियतकालिके, ग्रंथेत्तर साहित्य तसेच याव्यतिरिक्त अनेक अमूद्रित साहित्य (ध्वनिमुद्रिका, चलचित्र) स्वरूपात असतात. ही सर्व साहिम्य वर्षानुवर्ष टिकविण्यसाठी ग्रंथालयांना खूप मेहनत घ्यावी लागते. काही वेळेस संशोधकांना किंवा वाचकांना ही माहिती हाताळतांना त्रास होतो कारण ते जिर्ण अवस्थेत असतात. त्यामुळे अशा महत्वाच्या माहितीचे संसक्षण करून त्यांचे डिजिटल स्वरूपात परिवर्तन करून ते वाचकांना सुंरक्षितरित्या उपलब्ध करून देणे हे ग्रंथालयासाठी अणि संशोधकासांठी महत्वाचे असल्याचे दिसून येते.

**मुद्रित साहित्याची मर्यादा :**

ग्रंथालय साहित्यामध्ये जास्तीत जास्त मुद्रित साहित्याचा समावेश असतो.तसेच काही दुर्मिळ ग्रंथाचा पण समावेश असतो. या मुद्रित किंवा छापील साहित्य टिकविण्यासाठी ग्रंथालय प्रयत्न करी असतात. परंतू छापील साहित्य शेवटी कागदी स्वरूपात असते आणि कागदाच्या काही मर्यादा असतात. कालांतराने हे साहित्य नष्ट होण्याची शक्यता नाकारता येत नाही.म्हणूनच असे महत्वाचे साहित्य नष्ट होण्यापूर्वी योंग्य त्या माध्यमात परावर्तीत करणे आवश्यक आहे. याकरिता सर्वात सुरक्षित डिजिटल माध्यम असून ते कायम स्वरूपी होऊ शकते. म्हणून ग्रंथालय साहित्य संग्रहातील ग्रंथ संग्रहाचे डिजिटल स्वरूप परिवर्तन करणे आवश्यक आहे.

**ऑनलाईन माहिती वापरतांना येणा—या अडचणी :**

ऑनलाईन विविध स्वरूपातील माहिती उपलब्ध असते. परंतू ही माहिती व्यापारी तत्वावर उपलब्ध होत असल्याने ती वापरतांना त्याची किंमत मोजावी लागते तसेच त्याच्या काही अटी व नियम असतात. व तीचा वापर करतांना नेटवक सारख्या समस्यांना सामोरी जावे लागते. तंत्रानातील एका छोटयाशा बिघडाने माहितीचे प्रसारण बंद होते. त्यातुळे वाचकांना किंवा संशोधकांना त्यांच्या कामात अडथडा निर्माण होण्याची शक्यता नाकारू शकत नाही.या सर्व अडचणीच्या बाबी लक्षात घेता ग्रंथालयातील साहित्याचे डिजिटाजेशन एक उत्तम प्र्याय असल्याचे म्हणू शकतो.

अशाप्रकारे भविष्यातील ग्रंथालये म्हणजे डिजिटल स्वरूपातील ग्रंथालये असतील व त्याचा फायदा जास्तीत जास्त सशोधक व वाचकांना हाऊ शकेल असे गृहित धरू शकतो.

**निष्कर्ष** :

ग्रंथालयाच्या स्थित्यंतरांचा विचार करता प्राचीन काळ, आधुनिक काळ, आणि भविष्यातील उद्याची ग्रंथालये असे तीन प्रकारचे दिसून येतात. प्राचीन ग्रंथालयाचे स्वरूप बघता ही ग्रंथालये राजामहाराजा साठी, वंशपरंपरा नुसार व शिक्षण

देणारी असून या ग्रंथालयाचा वापर सिमित होता. आधुनिक ग्रंथालये ही मिश्र स्वरूपाची म्हणजेच पारंपारीक आणि तंत्रानाचा वापर यानुसार चालणारी आहेत व या गंथालयाचा वापर चांगल्या प्रमाणे होतांना दिसतो आहे. भविष्यातील म्हणजे उद्याची ग्रंथालये ही काळानुरूप बदलाव आणनारी असून संशोधकांच्या व वाचकांच्या सोईचे डिजिटल ग्रंथालय असेल व ग्रंथालयासाठी एक नविन प्रवाह येईल असे म्हणू शकतो.

**संदर्भ :**


- फडके, द.नात्र ग्रंथालय :— संगणकीकरण आणि आधुनिकीकरण, युनिव्हर्सल प्रकाशन, पुणे
- Vishwakosh. Marathi. Gove in/22593
- W. ग्रंथालयण विकिपीडिया
- Brainly.in,https://brainly.in
- https;..mr.wikipedia.org